**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मेगाफाईन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ३१ ते ३५, ४८ ते ५१, १ ते ५, २६ व क / गट नं. २०१, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक यांच्या कार्यरत प्रकल्प स्थानात प्रस्तावित कृत्रिम सेंद्रीय रासायनिक प्रकल्प (मोठ्या प्रमाणात औषधे मध्यवर्ती निर्मिती) विस्तारिकरणाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मेगाफाईन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ३१ ते ३५,४८ ते ५१, १ ते ५, २६ व क/गट नं. २०१, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक यांच्या कार्यरत प्रकल्प स्थानावर प्रस्तावित कृत्रिम सेंद्रीय रासायनिक प्रकल्प (मोठ्या प्रमाणात औषधे मध्यवर्ती निर्मिती) विस्तारिकरणाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित

अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५९ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-३१७५ दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, नाशिक - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२**) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

श्री रेदासनी, प्रतिनिधी, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर

लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

प्रतिनिधी, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मेगाफाईन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नं. ३१ ते ३५,४८ ते ५१, १ ते ५, २६ व क/गट नं. २०१, लखमापूर, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक यांच्या कार्यरत प्रकल्प स्थानावर प्रस्तावित कृत्रिम सेंद्रीय रासायनिक प्रकल्प (मोठ्या प्रमाणात औषधे मध्यवर्ती निर्मिती)

विस्तारिकरणाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प अन्वये २००६ कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना संवर्ग ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रतिनिधी, समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या वने,पर्यावरण व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन परवानगी अर्ज केला व सदरहू विभागाने पर्यावरण आघात अभ्यासाची रुपरेषा मंजूरी (Sanction of Terms of

Reference) दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी मप्रनि मंडळ मुख्यालयात पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज दिनांक २४-०५-२०१९ रोजी केला व त्यास मप्रनि मंडळ मुख्यालयाने दिनांक १३-०६-२०१९ रोजी मान्यता दिली. प्रकल्प प्रवर्तकांकडून दिनांक १४-०६-२०१९ रोजी शुल्क अदा केले व नाशिक जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२०१९ रोजी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेण्यास मंजूरी दिली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक ०५-०८-२०१९ रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०४-०८-२०१९ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी

स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत व कार्यकारी सारांशाची प्रत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम-पूर्व विभाग, न्यु सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नाशिक, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक, जिल्हा उद्योग केंद्र, तालुका व जिल्हा-नाशिक, तालुका कार्यालय- दिंडोरी, जिल्हा - नाशिक , पंचायत समिती, दिंडोरी, तालुका- दिंडोरी, जिल्हा- नाशिक, ग्रामपंचायत, कार्यालय-लखमापूर, दहेगाव / वागळूद, म्हेळुस्के, ओझरखेड. अवनखेड, परमोरी, ओझे, कादवा म्हाळुंगी, करंजवण, वलखेड, तालुका - दिंडोरी, जिल्हा - नाशिक , मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक , उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक , पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात

आलेले होते. प्रतिनिधी, समन्वयक यांनी असे सांगितले की स्थानिक मप्रनि मंडळ नाशिक कार्यालयास एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे. प्रतिनिधी, समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. प्रतिनिधी, समन्यवयक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद इतिवृतांत घेण्यात येईल व ते इतिवृत्त मराठी व इंग्रजीत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, व्हिडियो शुटींगसह केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नाव व गावाचे नाव सांगण्यात यावे. प्रतिनिधी, समन्वयक यांनी श्री रामदास खेडकर, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नाशिक तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक सुरु करण्याची विनंती केली.

श्री रामदास खेडकर, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की प्रथम प्रकल्पाचे प्रतिनिधी सादरीकरणाव्दारे प्रकल्पाचा विस्तार व पर्यावरण व्यवस्तापन योजनेबाबत संपूर्ण माहिती देतील. नंतर उपस्थितांना त्यांच्या प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविता येतील. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण करण्याचे आदेश दिले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प विस्तारिकरणाबाबत व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत संपूर्ण माहिती दिली.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांच्या सादरीकरणानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सादरीकरण केलेल्या अनुषंगाने प्रकल्पाचे स्वरुप, उत्पादन, रोजगार किती व सीईआर निधीबाबत काही शंका, आक्षेप, सूचना

असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना नोंदविण्यापूर्वी आपले नांव व गावाचे नाव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री देवेन इंदाते, राहणार-नाशिकः-**

प्रकल्प विस्तारिकरणानंतर रोजगाराची संधि देताना स्थानिकांचाच विचार व्हावा व कंपनीने जास्तीतजास्त झाडे लावण्याचा प्रयत्न करावा.

२) **श्री गंगाधर निखाडे, सरपंच, ओझरखेड ग्रामपंचायत, जिल्हा-नाशिकः-**

प्रकल्पात उत्पादन करताना काही धोके निर्माण होऊ शकतात का व त्याबाबत काय उपाययोजना आपल्याकडे उपलब्ध आहेत?

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात उत्पादनासाठी सेंद्रीय रसायने वापरावी लागतात. येथे कुठलाही विषारी वायू तयार होत नाही किंवा उत्पादन प्रक्रियेमुळे विषारी वायूचे उत्सर्जन होत नाही. प्रकल्पात मुख्य धोका हा आगीचा आहे. प्रकल्पातील धोका टाळण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व आधुनिक उपाययोजना अंगिकारली आहे. प्रकल्पात वेगवेगळ्या

प्रकारचे डिटेक्टरस म्हणजे स्मोक डिटेक्टर्स, हायड्रोकार्बन डिटेक्टर्स, स्प्रिंकलिंग व्यवस्था, आगीची हायड्रंट व्यवस्था, डिझेलवर चालणारे फायर पंप्स कार्यान्वित केलेले आहे. जेथे आग लागण्याची शक्यता असते, अशा ठिकाणी स्प्रिंकलर्स व्यवस्था आपोआप कार्यान्वित होईल. तसा प्रसंग झाला तर आपोआप स्प्रिकलिंग व्यवस्था कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी मॅन्युअल कॉल पॉईंट्स विकसित केलेले आहेत. त्याठिकाणी धुर किंवा आग लागली असल्यास हातोडीने तोडल्यावर अलार्म वाजतो, तेथील व्यवस्था बंद करण्यात येऊन स्प्रिकलिंग व्यवस्था आपोआप सुरु होते.

श्री निखाडे यांनी अजून एक सूचना केली की सीएसआर निधी गावातील कामांसाठी वापरला नाही तरी चालेल. पण एक अग्निशामक गाडी (फायर ब्रिगेड) व त्यावर पूर्णवेळ एक वाहनचालक ठेवण्यात यावा. कारण येथे अपघात झाल्यास नाशिक, पिंपळगाव येथून गाड्या मागाव्यावा लागतात. त्या येण्यास वेळ लागतो. म्हणून गाडी व त्यावर वाहनचालक २४ X ७ उपलब्ध करण्यात यावा. प्रकल्प प्रवर्तकांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली.

३) <u>प्राचार्य के.के. अहिरे, कादवा इंग्लीश स्कूल एन्ड ज्युनियर कॉलेज, लखमापुर, तालुका - दिंडोरी, जिल्हा-नाशिकः-</u>

प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व सुरक्षा व्यवस्था कार्यान्वित केलेली असेलच. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी (कॉर्पोरेट एन्व्हॉरमेंट रिस्पॉन्सिबिलिटी निधी) सीईआर व कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी (सीएसआर) सामाजिक बांधिलकी म्हणून वापरल्यास तो कौतुकास्पद राहिल. त्याचप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापकांनी स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याचे आश्वासन दिलेले आहे, तशी संधि देणार काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की भारत सरकारच्या निर्देशांप्रमाणे सीईआर निधी ७५ लाख उपलब्ध होणार आहे. सीईआर निधी अंतर्गत जी कामे करावयाची असतात, त्यांना माननीय जिल्हाधिकारी यांची परवानगी लागते. त्याप्रमाणे माननीय जिल्हाधिकारी यांना हाती घेण्यात येणा-या कामाचे प्रस्ताव सादर करण्यात येईल. त्यात पहिल्या दोन वर्षांसाठी भूजल पुनर्भरण योजना (Ground Water Recharge) परिसरात तीन ठिकाणी हाती घेण्यात येणार आहे. आपला सर्वांचा अनुभव आहे की पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो व उन्हाळ्यात रोजच्या कामांसाठी पाणी मिळत नाही. त्यासाठी भूगर्भातील पाणीसाठवण वाढवणे आवश्यक आहे. परिसरातील तीन विहिरींसाठी भूजल पुनर्भरण योजना (Ground Water Recharge) योजिले आहे. त्याचप्रमाणे सीएसआर निधी अंतर्गत कादवा गावातील इंग्रजी शाळा व लखमापूर गावातील शाळांमध्ये मुलींसाठी व मुलांसाठी वेगवेगळी स्वच्छतागृहे बांधून देण्यात येणार आहेत.

४) **<u>श्री कानिफ जाधव, राहणार-लखमापुर. तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिकः-</u>**

प्रकल्प प्रवर्तकांची एक रुग्णवाहिका (Ambulance) आहे. तिचा उपयोग नागरिकांना होईल काय?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पातील संभाव्य अपघात धोका/प्रसंगासाठी रुग्णवाहिका आहे. मात्र पूर्वी ज्या ज्या वेळी स्थानिकांनी रुग्णवाहिका मागितली आहे, त्या त्या वेळी ती उपलब्ध करण्यात आलेली आहे. ती जबाबदारी आम्ही पुढेही पाळणार आहोत. रुग्णवाहिका ही २४ X ७ कंपनीच्या आवारात उपलब्ध असते. त्यासाठी स्थानिक गावांमध्ये दोन नंबर सर्वांसाठी प्रदर्शित (display)/उपलब्ध करण्यात आलेले आहेत. ते गावातील सर्वांना माहित आहेत. तरी गरज असल्यास ती नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

५) **<u>श्री शेखर दंडगवान, एम एन्वॉयरो, नाशिक, राहणार-नाशिकः-</u>**

माझा प्रश्न हा ई-वेस्टबाबत आहे. इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक्स घन कचरा प्रकल्पातील ई-वेस्टची विल्हेवाट कशा प्रकारे लावण्यात येणार आहे?

प्रकल्प प्रवर्तकांच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की प्रकल्पात ई-वेस्ट निर्माण होणारे स्त्रोत (source) लक्षात घेऊन त्याप्रमाणे घन स्वरुपातील ई-वेस्ट गोळा करण्यात येते व मप्रनि मंडळाने मान्यता प्रदान केलेल्या रिसायकलर्स/पुनर्प्रकिया करणा-या संस्थांना

ते देण्यात येते. तेथून ते रिसायकल होते. त्याचे संपुर्ण रेकॉर्ड हे प्रकल्प प्रवर्तकांकडे आहे.

**६) श्री रविंद्र मोरे, सरपंच, करंजवण, तालुका-दिंडोरी,जिल्हा-नाशिकः-**

प्रकल्प प्रवर्तकांनी सामाजिक बांधिलकी म्हणून परिसरात काही कार्य केले आहे काय व त्याचा फायदा समाजास काय झाला याची सविस्तर माहिती मिळावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सीएसआर निधी अंतर्गत करण्यात येणा-या कामांचा आढावा सादरीकरणात सर्वांसाठी सांगितलेला आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी दरवेळी लखमापूर व आजूबाजूंच्या गावात सीएसआर अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. आमचा मुख्य उद्देश आहे शिक्षण देणे. शाळेत जे गरजू मुलेमुली आहेत, त्यांच्यासाठी योजना असो, त्यात शाळेसाठी पायाभूत सुविधा असो किंवा गरजू मुलांमुलींसाठी शिक्षण, प्रशिक्षण, शैक्षणिक साहित्य असो असे उपक्रम राबवविले आहेत. युवाशक्तीतर्फे विविध उपक्रम राबवविले आहेत. मध्यंतरी प्रकल्प प्रवर्तकांनी रस्यावरिल सुरक्षा हा उपक्रम हाती घेतला, त्यात दुचाकी चालविताना हेल्मेट का गरजेचे आहे याबाबत जनजागृत्ती उपक्रम हाती घेतला. त्याचप्रमाणे महिलांसाठी वैयक्तिक स्वच्छता हा उपक्रम राबवून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या

दोन तारखांना आम्ही जवळील गावात सीएसआर उपक्रमाबाबत व वैयक्तिक स्वच्छता महिलांसाठी कशी आवश्यक आहे याबाबत माहिती देतो.

त्याचप्रमाणे भावी पिढीसाठी शाळा व शाळेतील मुलामुलींचा विकास व्हावा, त्यासाठी शाळांना संगणक पुरवून मुलामुलींना संगणक प्रशिक्षण देण्यात येते. यात जर कुणाचे काही विशिष्ट उपक्रमाबाबत शिफारसी असतील, तर त्याचा आम्ही निश्चितच विचार करु.

**७) <u>श्री कैलाश गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य, मडकीजाम, तालुका दिंडोरी, जिल्हा-नाशिकः-</u>**

कंपनीत जे ओएससी (ऑक्युपेशनल हेल्थ सेंटर) कार्यरत आहे, त्याचा फायदा सामान्य नागरिकांना व्हावा. त्यासाठी काही प्रयत्न करता येतील काय? त्याचप्रमाणे कंपनी जो सीएसआर निधी विविध सामाजीक उपक्रमांसाठी खर्च करते. तो फक्त पाच कि.मी. परिसरातच न वापरता अतिदुर्गम भागातील राहणा-या लोकांसाठीही वापरावा. जेणेकरून लोकांचा सर्वांगीण विकास व्हावा हा उद्देश लक्षात घेऊन ही विनंती करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की याविषयांबाबत ब-याचवेळा चर्चा केलेली आहे. कंपनीने २०२० पासून सदरहू योजना राबविण्याचा विचार आहे. अपोलो, वोकार्डसारखी मोठी प्रसिध्द

हॉस्पिटल्सच्या मदतीने महिन्यातून एकदा किंवा तीन महिन्यांतून एकदा आरोग्य शिबिर गावांसाठी आयोजित करणे असा उपक्रम राबवविता येईल. प्रकल्पापासून जरी मडकीजाम गाव हे लांब असले तरी त्यागावातून बरेच कामगार प्रकल्पात आहेत. मडकीजाम गावातील लोकांसाठी निश्चितच सामाजीक उपक्रम राबवू.

त्याचवेळी प्रकल्प प्रतिनिधींनी उत्तर दिले प्रकल्पात फॅक्टरी कायद्यानुसार व्यावसायिक आरोग्य केंद्र (ऑक्युपेशनल हेल्थ सेंटर) कार्यान्वित असणे बंधनकारक आहे. त्याचा मुळ उद्देश प्रकल्पात एखादा अपघात वा एखादा आणीबाणी प्रसंग झाल्यास त्यावेळी अत्यंत निकडीची गरज असलेल्या व्यक्तीस त्वरित वैदकीय मदत मिळणे हा आहे. त्यामुळे प्रकल्पातील ओएचसी हा प्रकल्पातील गरजेसाठी आहे. मात्र प्रकल्प प्रतिनिधींनी आता दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मोठ्या हॉस्पिटलच्या सहकार्याने वैदकीय मदत देण्याची योजना वा वैदकीय शिबिरे विशिष्ट कालावधीसाठी राबविणे यासाठी भविष्यात प्रयत्न करण्यात येईल.

८) **<u>श्री व्ही.सुनंदा रेड्डी, जेष्ठ पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरणा परिरक्षना संस्था, नालगोंडा, तेलंगणाः-</u>**

भारतातील सर्वात प्रथम पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पाच्या बाजुने बोलतो. भारतात सर्वात मोठे प्रदूषण हे रोजगाराचे आहे. कारण भारतात १८ ते ३५ वयातील सुमारे ४०

कोटी युवक-युवती आहेत की जे नोकरीच्या शोधात आहेत. त्यांनी त्यांचे लेखी निवेदन वाचून दाखविले. त्यात त्यांनी १० कि.मी. अभ्यासाच्या परिघातील लोकांची आरोग्य स्थिती, पिकांचे उत्पादन व भूगर्भातील पाण्याची उपलब्धतता याचा अभ्यास करुन सद्यस्थिती अहवाल तयार करण्याची सूचना केली.

श्री रेड्डी यांनी पावसाचे पाणी वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात साठवण टाकी (storage tank) बांधण्याची सूचना केली, जेणेकरुन उन्हाळ्यात ते पाणी वापरता येईल. त्याचप्रमाणे शैक्षणिक पात्रता असलेले स्थानिकांना रोजगारात संधि देण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे स्थानिक युवक युवतींना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात यावे. प्रकल्प अधिकारी, मप्रनि मंडळ अधिकारी, शासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात यावी व सीएसआर निधी अंतर्गत विविध सामाजिक कामे राबविताना गरजेनुसार विशिष्ट प्रकल्पास प्राधान्य देण्यात यावे. श्री रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमतीसाठी मिळण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केंद्र शासनास शिफारस करावी अशी विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी श्री रेड्डी यांनी प्रकल्पास पाठिंबा दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानले व त्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली.

९)**<u>डॉ. जे. बी.संगेवार, प्रादेशिक अधिकारी,मप्रनि मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

अ) प्रकल्प विस्तारिकरणामुळे औद्योगिक सांडपाण्याच्या निर्मितही वाढ होईल. त्यासाठी औद्योगिक सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा ही सक्षम आहे काय वा त्याचीही क्षमता वाढविणार याबाबत पर्यावरण सल्लागार यांनी अहवालात उल्लेख केलेला नाही. सद्यस्थितीत ३०.४ घनमीटर प्रतिदिन औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होते. विस्तारिकरणानंतर ११९. ६ घनमीटर प्रतिदिन अतिरिक्त सांडपाणी निर्मिती होईल. त्याबाबत एमईई वापरणार काय याबाबत विचारणा करण्यात आली.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की एमईईचा एकदाच खर्च करण्यात आला. जागेच्या अडचणीमुळे जास्त क्षमतेची एमईई घेण्यात आला. प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की रिव्हर्स ऑस्मॉसिससाठी अतिरिक्त जागा राखीव ठेवलेली असून आर.ओ. प्रकल्पाच्या डाव्या बाजूस नविन रिव्हर्स ऑस्मॉसिस बसविण्यात येईल. हायटीडीएस असणा-या सांडपाण्यासाठी एमईई वापरण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हायटीडीएस सांडपाणी किती प्रमाणात उत्पन्न होईल याबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रतिनिधी यांनी सांगितले की ४.० घनमीटर प्रतिदिन प्रोसेस सांडपाणी व रिव्हर्स ऑस्मोसिसमधून

१६.० घनमीटर प्रतिदिन असे २०.० घनमीटर प्रतिदिन हायटीडीएस सांडपाणी निर्माण होईल.

प्रकल्प प्रतिनिधी यांनी सांगितले की विस्तारिकरणानंतर अतिरिक्त ३०.० घनमीटर प्रतिदिन सांडपाणी निर्मिती होईल. प्रकल्पात ६०.० घनमीटर प्रतिदिन क्षमतेचा प्रक्रिया करणारा एमईई कार्यरत आहे.

ब) उत्पादनाची नावे ही ट्रेड प्रमाणे दिलेली आहे. ती नावे केमिकल नावाने असावीत.

क) कंपनी जुनी आहे. त्यामानाने हरितपट्ट्याचा विकास व्हायला पाहिजे तसा नाही. प्रकल्पात ग्रीन फेन्सिंग नाही. ग्रीन फेन्सिंगमुळे संरक्षण मिळू शकते. प्रकल्प प्रतिनिधी यांना सदरहू सूचनेचे अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले.

ड) वीओसी सर्वेक्षणाबाबत काय असा प्रश्न सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केला. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वीओसी मॉनिटरिंगसाठी कन्डेनसेशन व्यवस्था आहे. सदस्य यांनी सांगितले की लखामापूर येते सेन्सर लावण्यात यावा. तीन महीन्यात एकदा करण्यात यावे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासाठी अभ्यास करताना आठ ठिकाणी सर्वेक्षण केले असता विओसी हा बिलो डिटेक्टीव्ह लिमिटमध्ये आढळले. कारण असे असू शकते

की या परिसरात रासायनिक कारखाना हा एकच आहे. त्यामुळे हवेत हायड्रो कार्बनचे प्रमाण खूपच कमी आहे. आता वर्क रुममध्ये डिटेक्टर्स लावले जाणार आहेत.

इ) सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की परिसरातील लोकांचा सद्यस्थितीतील आरोग्य अहवाल तयार करण्यात यावा. परिसरातील दोन गावे विचारात घेऊन आरोग्य अहवाल/डाटा तयार करण्यात यावा.

ई) १/२ कि.मी. परिसरातील पीकांचा सदस्यस्थिती अहवाल तयार करण्यात यावा. तो अहवाल बेसलाईन डाटा म्हणून इतरांना उपयोगी पडेल.

१०) श्री **वाल्मिक मोगल, माजी उपसरपंच, लखमापुर, जिल्हा-नाशिकः-**

त्यांनी प्रकल्पास शुभेच्छा देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाच्या शेजा-यांचा विचार करावा. पंचायतीपर्यंत वाद येऊ नये. आपापसात सहकार्य करावे. प्रकल्पाच्या प्रतिनिधी यांनी श्री वाल्मिकी यांचे आभार मानले व प्रकल्प व्यवस्थापक नेहमीच सहकार्याची भावना ठेवतात असे मत मांडले.

११) **श्री विजय देशमुख, लखमापुर, तालुका-दिंडोरी,जिल्हा-नाशिकः-**

कंपनीच्या २-३ कि.मी. अंतरावर शेती आहे. सादरीकरणात सांगितले की सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड

डिस्चार्ज प्रकल्प आहे. मात्र कंपनीच्या जवळून एक नाला जातो. प्रदूषणामुळे जवळील नाला पूर्णपणे दुषित झालेला आहे. तुमचे असे म्हणणे आहे काय की कंपनीमुळे नाल्याचे प्रदूषण होत नाही.

प्रकल्प प्रवर्तकांच्या प्रतिनिधींनी सांगितले की प्रकल्पात कुठेही गळती नाही. सांडपाणी ज्या स्त्रोतात निर्माण होते, त्या स्त्रोतापासून एचडीपीई पाईप्समधून औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेच्या जवळ इनलेटजवळ आणले जाते. प्रकल्पात शास्त्रीय पध्दतीने सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा ही कार्यक्षम आहे. प्राथमिक प्रक्रियेत ससपेन्डेड सॉलिड्स काढून घेतले जातात. नंतर सांडपाण्यावर बॉयॉलॉजिकल प्रक्रिया केली जाते. प्रकल्पात आर.ओ. व एमईई प्रक्रिया योजना आहे. ती सद्यस्थितीत सर्वात उच्च दर्जाची प्रक्रिया यंत्रणा आहे. सर्व सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येतो. प्रकल्पातील बॉयलरला व कुलिंग टॉवरला प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करण्यात येतो. प्रकल्पात पर्यावरण प्रयोगशाळा असून दररोज त्याची पहाणी केली जाते. प्रत्येक स्तरावर विघटनक्षमता तपासली जाते. विघटन झाल्यावर अंतिम पाण्यावरही लक्ष असते. त्यामुळे कुठेही निचरा होत नाही.

श्री देशमुख यांनी सांगितले की आता पाऊस असल्याने भरपूर पाणी आहे. मात्र नंतर नाल्याच्या पाण्याचा खूपच वास येतो.

विस्तारिकरणास आमचा विरोध नाही. पण अतिरिक्त सांडपाणी क्षमता वाढेल. त्याने नाला प्रदूषित होईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पावसाळा संपल्यावर म्हणजे चार-सहा महिन्यांनी आपणास नाल्यामुळे काही त्रास झाल्यास मप्रनि मंडळाच्या स्थानिक कार्यालय म्हणजे उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक यांच्या कार्यालयात संपर्क साधावा व लेखी हरकत घेण्यात यावी. मप्रनि मंडळ आपणासमक्ष नाल्याच्या विविध ठिकाणी पहाणी करेल व शहनिशा केला जाईल. जो दोषी आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री देशमुख यांनी लेखी तक्रार देण्याची वेळ वाढवून मागितली. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले की जर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस आपणास तक्रार द्यायची असल्यास ती बैठकीत देण्यात यावी. त्याला मुदतवाढ, वेळ वाढवून मिळणार नाही. मात्र आपण इतर तक्रार केव्हाही स्थानिक कार्यालयात करु शकतात.

१२) **<u>श्री तुषार मधुकर वाघमारे, नगरसेवक, दिंडोरी नगरपरिषदः-</u>**

मेगाफाईन कंपनीचा अनुभव चांगला आला. आम्हा कोणालाही सीएसआर म्हणजे काय हे माहित नव्हते. त्यांनी झाडे लावली व झाडांना संरक्षण करण्यासाठी जाळ्याही लावल्या, त्यामुळे आता

झाडे छान वाढली आहेत. त्यांच्याकडून अशीच सहकार्याची अपेक्षा आहे.

१३) **<u>श्री शांताराम पगारे, राहणार-कादवा म्हाळुंगी, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिकः-</u>**

कंपनीने परिसरातील गावात कोणती कामे केली, त्याची माहिती द्यावी व कोणती करणार आहेत, त्याची माहिती द्यावी. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सादरीकरण व प्रश्नांना उत्तर देताना दोन्हीही माहिती म्हणजे यापूर्वी केलेली कामे व भविष्यात करण्यात येणारी कामे याची माहिती प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितली आहे. श्री पगारे यांनी आक्षेप नोंदविला की अवनखेड व म्हेळुस्के गावात कंपनीने एकही काम केलेले नाही. प्रकल्प प्रतिनिधींनी त्याबाबत लक्ष घालण्याचे मान्य केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की -

१) नविन प्रकल्पात कामगारांच्या सुरक्षेचा विचार करताना जर प्रकल्पात आग लागली तर एकत्र येण्याची जागा (Assembly Point) दिसला नाही, तर तो दाखविण्यात यावा. प्रकल्प प्रतिनिधींनी नकाशावर दाखविले की दोन Assembly Points आहेत. एक कॅन्टीन जवळ व दुसरा मेनगेटजवळ.

२) अध्यक्षांनी मत मांडले की Assembly Point साठी त्वरित जाण्यासाठी योग्य मार्गदर्शन हवे. Assembly Point ला जाण्यासाठी Accessibility विचारात घ्यावी. Assembly Point हा कायमचा करण्यात यावा. हरितपट्टा व Assembly Point हे दोन्हीही वेगवेगळे विषय आहेत. नकाशावर Assembly Point ला मार्क करण्यात यावे.

३) कर्मचा-यांची सुरक्षिततेसाठी आरोग्य अहवाल व त्याचा तपासणी कालावधी करण्यात यावा. प्रकल्पात काम करताना विविध रसायनांशी संबंध येणार. एखाद्यास पहिल्यापासून त्रास असेल व रसायनामुळे तो गंभीर होऊ शकतो. त्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी सर्वांचे आरोग्य अहवाल ठेवण्यात यावा,

४) प्रकल्पात Onsite Disaster Management Plan हा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालयाकडून २००६ च्या नियमांनुसार बंधनकारक करण्यात आलेला आहे. तो डिश व जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात यावा,

५) अनेक नागरिकांनी व पदाधिका-यांनी चांगल्या सूचना केल्या. आरोग्य अहवाल (Health Status), पीकांचा अहवाल (Crop Status) व (Geological Status) भौगोलिक अहवाल तयार करण्यात यावा,

६) सीईआर निधीबाबत सूचना चांगल्या आल्या. तरी एक सूचना करण्यात येते की जरी जिल्हाधिकारी याची उपक्रमासाठी परवानगी लागते, तरी उपक्रमास स्थानिक गरजेनुसार प्राधान्य देण्यात यावे. एखाद्या गावात एखादा उपक्रम राबविल्यास नंतर तो दुस-या गावात राबविण्यात यावा.

७) आता गरज आहे हाताला काम मिळणे. त्यासाठी Skill Upgradation Programme हाती घेण्यात यावा. त्यामुळे ती व्यक्ती स्वावलंबी होण्यास मदत होईल. केंद्र शासनाची अटल योजना आहे. शासन विविध ठिकाणी जाऊन प्रशिक्षण देते. याठिकाणी प्रकल्प प्रवर्तकांनी आर्थिक पाठबळ द्यावे. एखादे यंत्र दिल्यास ती व्यक्ती स्वावलंबी होऊ शकते.

८) परिसरातील महिला सबलीकरण (Women Empowerment) करण्यासाठी योजना तयार करुन राबवाव्यात. आता प्लॅस्टिक बंदीमुळे कागदाच्या पिशव्या करण्यास मदत केल्यास त्या स्वावलंबी होऊ शकतात. त्याची Skill Upgradation व Women Empowerment हे दोन उपक्रम प्राधान्याने घ्यावेत अशी सूचना करतो.

९) स्थानिक शेतक-यांना व स्थानिकांना सहकार्य करा.

१०) प्रस्तावित प्रकल्पास मार्क करा व Onsite Disaster Management Plan जिल्हाधिकारी कार्यालयास संमत करण्यात यावा.

अध्यक्षांनी बैठकीचा समारोप करताना प्रकल्प प्रवर्तकांना नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करावा असे आवाहन केले व बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| ( ) | ( ) |
| **अ.मा. करे,** | **डॉ. जे.बी.संगेवार,** |
| समन्वयक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| मप्रनि मंडळ,नाशिक | मप्रनि मंडळ, नाशिक |

**( रामदास खेडकर),**

**अध्यक्ष**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नाशिक

जिल्हा- नाशिक